# प्रकरण - २

## व्यक्तिचित्रणाची कला

# प्रकरण - २

## व्यक्तिचित्रणाची कला

### स्वभावलेखनकलेचे वाङ्मयातील स्थान

व्यक्तिचित्रण किंवा स्वभावलेखन हा वाङ्मयकृतीतील अेक महत्वाचा घटक आहे. वाङ्मयकृतीला सामान्यतेच्या कक्षेतून अुचलून अलौकिकतेच्या प्रांतात नेअून ठेवण्याचे सामर्थ्य स्वभावलेखन कलेत असते. ही स्वभावलेखनकला सर्व लेखकांना अवगत असणे आवश्यक आहे. मानवी विकार हे ललितकलेचे माध्यम असून वर्णयुक्त वाणी या साधनाव्दारे विचार प्रकटीकरणाचे कार्य लेखक करीत असतो. तथापि नुसत्या मानवी विकारांचे ज्ञान वाङ्मय लेखकास पुरे पडत नाही. अेखादी व्यक्ती विशिष्ट प्रसंगी कशी वागेल हे कल्पनेने जाणून घेणे त्याला आवश्यक असते. यासाठी त्याला स्वभावलेखनकलेची कास धरावी लागते. वाङ्मयाची भाषा मनुष्यस्वभावही आहे. म्हणून वाङ्मयलेखनासाठी स्वभावलेखनकला पायाभूत ठरते. प्रख्यात आंग्ललेखक गार्डिनर याने ` सर्टन मेन ऑफ अिम्पॉर्टन्स ` या पुस्तकाच्या प्रस्तावनेत स्पष्टच म्हटले आहे की, गेल्या पंधरावीस वर्षातील कालाचा ओघ व्यक्तिस्वभावाच्या भाषेत सांगण्याचा या पुस्तकात मी प्रयत्न केला आहे,` [१] म्हणूनच स्वभावलेखनकलेला वाङ्मयात स्वतंत्र मान आहे. वाङ्मयाचा अुच्च हेतू जो आनंदनिर्मिती आहे तो मनुष्यस्वभावाच्या भिन्नभिन्न चित्रातून पूर्ण होतो.

त्याची कृती, राहणी, विचार व भाषा यांचा बारकाईने विचार करावा लागतो. प्रतिमालेख जिवंत वाटावा यासाठी वर्गविशिष्ट भाषेचा उपयोग त्या व्यक्तीच्या तोंडी करणे आवश्यक ठरते, शेक्सपियरने अनेक अमर व्यक्तिरेखा निर्माण केल्या तरीही, 'विशिष्ट भाषापद्धतीने शेक्सपियर आपल्या व्यक्तिरेखा भिन्न भिन्न करून दाखवीत नाही,' [४] अशी तक्रार टॉलस्टॉयने केली आहे. शेक्सपियरने सर्व नाटके पद्यात लिहिली असल्याने हा दोष निर्माण झाला असे म्हणतात. तथापि यावरून वर्गविशिष्ट भाषेच्या वापराचे महत्व लक्षात येण्याजोगे आहे. भाषेप्रमाणेच मानवाची कृती, राहणी व विचार यावरून त्याचा काल, प्रांत व वर्ग यांची नेमकी जाणीव वाचकांना होत राहिली तर प्रतिमालेख यशस्वी ठरतो.

## मनोरचनेचे दर्शन हवे.

व्यक्तिरेखा तयार करताना व्यक्तीच्या भाषेबरोबरच तिची मनोरचना व शारीरिक हालचाल या साधनांचा उपयोग करावा लागतो. व्यक्तीची मुद्रा, तिचा आवाज इतकेच नव्हे तर तिच्या प्रत्येक हालचालीत इतर व्यक्तीपासूनची भिन्नता प्रकट होत असते. विचारातून मानव व मानवातून प्रतिमालेख तयार झाल्यावर शरीर व मन यांची विशिष्ट ठेवण व शरीराच्या विशिष्ट हालचाली यांचा पुरेपूर तपशील लेखकाने भरला की ती व्यक्तिरेखा सचेतन होऊ लागते. व्यक्तिरेखा स्पष्ट करण्याचे एक प्रमुख साधन म्हणजे मनोरचनेचे वर्णन हे होय. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' या न्यायाने प्रत्येक व्यक्तीची मनोरचना ही भिन्न असते. मानवी मनाची भिन्न रचना सुस्पष्टपणे दाखविणे हे स्वभावलेखनकलेचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य किंबहुना तो तिचा आत्माच होय. व्यक्तीची विशिष्ट मनोरचना हेच व्यक्तिरेखा अमर करण्याचे खरे साधन आहे, हे लेखकाने लक्षात

ठेवले पाहिजे. विशिष्ट मनोरचनेचे यथार्थ दर्शन घडविणे लेखकाला साधले नाही, तर व्यक्तिरेखा निर्माण करण्यात, लेखक अयशस्वी ठरला, असेच म्हणावे लागेल. याउलट हे कार्य जर त्याला साधले तर इतर अनेक त्रुटी असल्या तरी तो आपल्या वाङ्मयास नावलौकिक प्राप्त करुन देऊ शकतो. शेक्सपियरचे सर्व स्वभावलेखन मनोरचनेच्या वैशिष्ट्यामुळेच चिरंतन झाले आहे. मनोरचनेस अनुरुप अशी भाषासरणी असली म्हणजे व्यक्तिरेखा अधिक स्पष्ट होते व विशिष्ट शब्दप्रयोग व अंगविक्षेप यांनी तिला शेवटची सफाई येते. डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी उत्तम व्यक्तिरेखनाचे रहस्य पुढील प्रमाणे विशद केले आहे - ` विचार विकारांची माती थापून काल, प्रांत, वर्ग, वृत्ती, राहणी, विचार, मनोरचना, भाषासरणी व अंगविक्षेप या कोरण्या लावून मूर्ति तयार केली की उत्तम व्यक्तिरेखा तयार होते. ` [५]

स्वभावलेखनासाठी निवडलेली व्यक्ती ` प्रतिमा ` असावी.
------------------------------------------------

अशात-हेने वाङ्मयात निर्माण होणारी ही व्यक्तिरेखा वाचकांना आकर्षक वाटावी व तिने अनेकांच्या सुखदु:खाचे प्रतिनिधीत्व करावे, याची खबरदारी लेखकाने घेणे आवश्यक आहे. लेखकाने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखेशी वाचक तादात्म्य पावला तर वाङ्मयात खरा रस निर्माण होऊ शकतो. यासाठी स्वभावलेखनासाठी निवडलेली व्यक्ती ` प्रतिमा ` असावी लागते म्हणजेच तिची सुखदु:खे ही आपली सुखदु:खे असे वाटणारा समाजात एक बराच मोठा वर्ग असावा लागतो. ती व्यक्तिरेखा मानवजातीची प्रतिनिधी असावी लागते. म्हणून क्लेटन हॅमिल्टन म्हणतो, ` ललितकृतीत येणा-या प्रत्येक व्यक्तीच्या अंगी सामान्य गुण असलेच पाहिजेत. सामान्य व विशेष असले तर चांगलेच पण केवळ विशेष गुण असणा-या व्यक्ती ललित कृतीत येणेच शक्य नाही. ` [६] पण लक्षात कोण घेतो ! मधील यमुना, ` जादूगार ` मधील इंदुमती, ` दौलत ` मधील

निर्माण या व्यक्तिरेखा ` प्रतिमा ` असल्यामुळे वाचक त्यांच्याशी अेकरूप होअू शकले.

स्वभावलेखनातील सुसंगती -

लेखकाने स्वभावलेखनातील सुसंगतीकडे लक्ष ठेवणे ही अेक महत्वाची बाब आहे. कादंबरी किंवा नाटक यात व्यक्ती जेव्हा प्रथम प्रवेश करते तेव्हा तिचा जो स्वभाव व्यक्त होअील, तिचे जे विकार विचार दिसतील, तिची जी बोलण्याची पध्दत असेल, तीच शेवटच्या प्रवेशापर्यंत तशीच टिकणे याला स्वभावातील सुसंगती असे म्हणता येअील. तथापि कथानक रचनेतील दोषामुळे, बोधवादाच्या हव्यासामुळे, विनोद निर्माण करण्याच्या हौसेमुळे व मानवी मनोविकारांच्या अज्ञानामुळे लेखकाकडून स्वभावलेखनात विसंगती निर्माण होअू शकते, म्हणून लेखकाने याबाबतीत सावधानता बाळगणे आवश्यक आहे. ज्या लेखकाला मनोविश्लेषणाचे ज्ञान आहे, त्याच्या हातून हा विसंगतीचा दोष कमीत कमी संभवतो. डॉ. सहस्त्रबुध्दे म्हणतात, ` मनाचे अगदी सूक्ष्मातील सूक्ष्म तंतू कसे हलत असतात, स्वाभिमान, प्रेम, स्वार्थ, औदार्य अित्यादी विकारांची आंदोलने या मानससरोवरात व कशी चालू असतात, याचे यथार्थ-वर्णन म्हणजेच मनोविश्लेषण. हे मनोविश्लेषण ज्याला येत नाही, त्या लेखकाची कृती अुच्च वाङ्मयात समाविष्ट होणे शक्य नाही.`[८] यावरून अुत्कृष्ट स्वभावलेखनासाठी मनोविश्लेषणाचे ज्ञान असणे किती आवश्यक आहे, हे दिसून येअील.

स्वभावलेखन करीत असताना काही लेखक निवेदन पध्दतीचा आश्रय घेतात. तथापि निवेदन पध्दतीमुळे व्यक्तीच्या स्वभावाची यथार्थ कल्पना येत नाही व त्यामुळे अशाप्रकारचे स्वभावलेखन वाचकांना संतुष्ट करू शकत नाही. लेखकाने केलेल्या निवेदनामुळे वाचकांचा विरस होतो व ते लेखकाच्या व्यक्तिचित्रणाशी तद्रूप होअू शकत नाहीत. म्हणून आधी व्यक्तीची कृती, संवाद, तिच्याबद्दलचे अितरांचे अुद्गार, अितरांचे ....

तिच्याशी वर्तन अित्यादी साधनांनी तिची स्वभावरेखा काढून मग जरूर तर निवेदन करणे हीच पध्दत योग्य वाटते. वाचक व कथानक यामधून लेखक अदृश्य झा झाल्याखेरीज ख-या अर्थाने रसनिर्मिती होअू शकत नाही. `जादूगार`, `हिंदोळ्यावर` `दोन ध्रुव` `भंगलेले देअूळ` या कादंब-यामध्यें निवेदन शक्य तोवर टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यक्तींचे आचरण, त्यांचे संवाद व मनोविश्लेषण अेवढे देअून त्यावरून काय निष्कर्ष काढावयाचे ते वाचकावर सोपविण्यात आलेले आहे. लेखकाचे अस्तित्व ब न जाणविल्याने अुत्कट सत्याभास घडून आनंदनिर्मिती झाल्याने या कादंब-या विशेष रम्य झाल्या आहेत. `जादूगार` मधील `आनंदराव` ही व्यक्तिरेखा रंगविताना प्रा. फडके निवेदनाचा अेक शब्दही चुकून काढीत नाहीत, तरीसुध्दा ही रेखा अस्पष्ट होण्याअेवजी जास्तच रम्य होते. स्वभावलेखन पध्दतीच्या विलासाचा हा परमोच्च बिंदू मानावा लागेल.

## कादंबरी व नाटक यातील स्वभावलेखन -

कादंबरी, नाटक व लघुकथा या तिन्ही शाखा सारख्या असल्या तरी विस्तार, रचना, वर्णनपध्दती या दृष्टीने त्यात फार फरक दिसून येतो व त्यामुळेच त्यातील स्वभावलेखनही भिन्न स्वरूपाचे असते. कादंबरीत स्वभावलेखनाला खूपच वाव असतो, तसा नाटकात असू शकत नाही. परंतु नाटकात जी अुत्कटता असते ती कादंबरीत आणता येत नाही. प्रत्यक्ष दर्शन आणि अुद्गार व भाव यांचे अेकत्र दर्शन कादंबरीत शक्य होत नाही व त्यामुळे भावांचा ठसा नाटकाअितका प्रभावीपणे अुमटू शकत नाही. तथापि नाटककारावर अंक, प्रवेश अित्यादी रचनेची बंधने असतात, त्यामुळे स्वभावदर्शक किती व कोणते प्रवेश दाखवावे यावर मर्यादा येते. नाटककार वाचकाना सर्वस्थळी व सर्वकाळी नेअू शकत नाही, व अगदी आवश्यक असणारे प्रसंगही दाखवू शकत नाही. कादंबरीत काही वाक्यांचा प्रवेश

शक्य आहे, पण नाटकात तो तसा योजता येणार नाही. काही प्रसंगांचा केवळ उल्लेख करून नाटककार पुढे जातो तर कादंबरीकार त्यांचे बारकाईने वर्णन करू शकतो. त्यामुळे नाटकातील काही प्रसंग हे कादंबरीतील प्रसंगापेक्षा निर्जीव ठरू शकतात. नाटककार जे प्रसंग केवळ निवेदन पध्दतीने रंगवू शकेल त्यांचे कादंबरीकार दर्शनपध्दतीने वर्णन करू शकेल. तसेच नाटककाराला जे साधन नाटकात वापरणे शक्य नसते त्या साधनाचा - मनोविश्लेषणाचा - आधार कादंबरीकार घेऊ शकतो. ना.सी. फडके यांनी कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललितकथेचे अधिक महत्वाचे अंग मानले आहे व कादंबरीचे श्रेष्ठत्व त्यातील मनोविश्लेषणावरच अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, ' उच्च कलेच्या दृष्टीने कथानकाच्या रचनेतील चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शनाच्या शोभेने सजलेल्या कादंबरीलाच श्रेष्ठ स्थान मिळेल. याचे कारण असे की बाह्य सृष्टीतील विविध वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंत:करणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्यांचे दर्शन वाचक प्रेक्षकांस घडले तर त्यास अधिक आल्हाद होतो. '[८] कादंबरीकार पात्रांच्या मनोरचनेचे पापुद्रे उलगडून दाखवितो, नाटककाराला हे शक्य होत नाही. मानवी मनातील भावनांचे विविध पदर केवळ कादंबरी व लघुकथा यातच दाखविणे सहज शक्य होते. मानवी मनाचे संपूर्ण दर्शन व पृथक्करण केवळ कादंबरीत शक्य असल्यामुळे याबाबतीत कादंबरी नाटकापेक्षा श्रेष्ठ ठरते. यासाठीच ' अमर असा व्यक्तिरेखा फक्त कादंबरीतच शक्य आहेत, '[९] असे गॅल्सवर्दीने म्हटले आहे.

नाटक व कादंबरी यातील स्वभावरेखना विषयीचा आणखी अेक महत्वाचा फरक म्हणजे कादंबरीत व्यक्तीच्या मनाचा विकास किंवा स्वभावाची घडण दाखविता येते, नाटकात मात्र हे शक्य होत नाही. नाटकातील व्यक्तिरेखा या आरंभापासून ते अंतापर्यंत ओतीव मूर्तीप्रमाणे अेकरूप असतात. नाटक हे रंगभूमीवर करावयाचे असल्याने त्याला सहाजिकच कालमर्यादा पडते. तीन-चार तासाच्या

अवधीत जे प्रसंग बसतील व जे रंगभूमीवर करून दाखविता येतील, तितकेच नाटकात समाविष्ट होऊ शकतात. पण व्यक्तीच्या मनाचा विकास दाखविण्यास जितका अवधी वा प्रसंग पुरेसे पडत नाहीत. नाटकात फक्त ओतीव रेखा दाखविता येतात. कादंबरीत त्या दाखवून मनोविकासाचे वर्णनही तपशीलाने करता येते.

लघुकथातील व्यक्तिरेखा -

लघुकथात व्यक्तिरेखासंबंधी विचार करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की कादंबरी हे सर्व संसाराचे चित्र असते तर लघुकथा संसारातील विशिष्ट घटनेचे किंवा प्रसंगाचे चित्र असते. मानवी जीवन हा अेक वृक्ष मानला तर त्याचा आडवा छेद घेणे लघुकथात शक्य होते. लघुकथामधील नायक, नायिका याना प्रातिनिधिक रूप असते. म्हणजेच त्या ` प्रतिमा ` असतात. त्यामुळे त्यांची सुखदु:खे, विचार-विकार यांच्याशी वाचक तादात्म्य पावतो. विशिष्ट मनोरचना स्पष्ट करण्यास कादंबरीच्या तुलनेने लघुकथेत वाव कमी असतो. तथापि अंगविक्षेप व भाषापद्धती यांची वैशिष्ट्ये व्यक्तिरेखेत आणणे शक्य असते. लघुकथातील व्यक्तिरेखेसंबंधी अीव्हलिन मे अल्ब्राअिट याने पुढील विचार व्यक्त केले आहेत - ` लघुकथात स्वभावाचा विकास कधीच दाखविता येत नाही. ओतीव स्वभावाचे संपूर्ण विशदीकरण लघुकथात शक्य नाही. तर लघुकथात विशिष्ट प्रसंगीचे परिवर्तन मात्र दाखविता येअील. जीवनाचे संबंध प्रवासाचे चित्र लघुकथेत शक्य नाही. पण त्या प्रवासातला अनेक मार्गांचा जो संपातबिंदू, जेथून जीवनाला अेकदम निराळेच वळण मिळते असा प्रसंग, हाच फक्त लघुकथात दाखविता येतो.` [१०]

लघुकथामध्ये विशिष्ट मनोरचना किंवा स्वभावाचा विकास दाखविणे अवघड असले तरी अेकाच व्यक्तीच्या अनेक कथा लिहिल्या तर हे काम सुलभ होऊ शकते. ताम्हणकरांची ` दाजी ` ही व्यक्तिरेखा किंवा अिंग्रजीतील ऑर्थर कॉनन डायल यांची ` शेरलॉक होम्स ` किंवा डिकन्सची ` पिकविक ` ही व्यक्तिरेखा यावरून ही गोष्ट लक्षात येऊ शकेल.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण -

कोणत्याही ललितकृतीत मानवी जीवनाला अधिक महत्व असते. कारण मानवी जीवनाचे चित्रण करण्यासाठीच ललितवाङ्मयाचा जन्म झाला आहे. मनुष्य हा ललितकृतीच्या केन्द्रस्थानी असतो. परंतु ललितवाङ्मयात ज्या जीवनाचे चित्रण केलेले असते त्या जीवनाला रंग, रूप, आकार मिळतो तो मानवी स्वभावामुळे. म्हणून ललितकृतीतील जीवनचित्रण हे अेका दृष्टीने मानवाचे स्वभावचित्रणच असते. हे स्वभावचित्रण त्या त्या वाङ्मयप्रकारामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने रंगविलेले असते. प्रत्येक वाङ्मयप्रकाराची प्रकृती ही भिन्न असल्याने सर्वत्र अेकसारखेच स्वभावचित्रणाचे स्वरूप आढळेल , असे नाही. कादंबरी, लघुकथा, नाटक या वाङ्मयप्रकारात कथेतील पात्रांचे स्वभावचित्रण भिन्न भिन्न पध्दतीने कसे केलेले असते याची चर्चा केलीच आहे. आत्मचरित्र ही ललितकृती असली तरी अितर वाङ्मयप्रकारांना स्वभावचित्रणाचे जे स्वातंत्र्य आहे , ते आत्मचरित्रकाराला नसते. अितर ललितकृतीत स्वभावचित्रणात कल्पनेचा रंग मिसळता येतो, परंतु आत्मचरित्रकाराला आपली सत्यदर्शनाची भूमिका सोडून रंग अुधळण करता येत नाही. त्यामुळे अितर ललितकृतीतील स्वभावचित्रणाचे निकष आत्मचरित्रातील स्वभावचित्रणाला तंतोतंत वापरणे धाडसाचे ठरते.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण हे अधिक वास्तव व जिवंत असते. कारण अितर कलांचा जडमानव हा विषय असतो तर वाङ्मयाचा विषय जिवंत मानव हा असतो, आणि आत्मचरित्रात तर अितर कोणत्याही ललितकलेपेक्षा व्यक्ती या खऱ्याखुऱ्या वास्तवातील असतात. अशा व्यक्तींचे चित्र रंगविणे हे फारच अवघड असते कारण सत्यदर्शनाचे अेक फार मोठे परंतु आवश्यक असे बंधन आत्मचरित्रकाराला स्वीकारावे लागते. त्यामुळे आत्मचरित्रकार हा आपले चित्र रंगविण्यात

जितका गुंतती तितका तो अितरांची चितत्र रंगविण्यात गुंतत नाही. लक्ष्मीबाअी टिळकासारखी अेखादीच समर्थ लेखिका त्याबाबतीत यशस्वी होते आणि वाचकांसमोर समर्थ व्यक्तिरेखा अुभ्या करते.

आत्मचरित्रकार आपल्या आयुष्यात आलेल्या व्यक्तीचे जेव्हा स्वभावचित्रण करतो, तेव्हा आणखी अेक मर्यादा पडते. त्या त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्रण हे आत्मचरित्रकाराच्या दृष्टीतून आलेले असते. आत्मचरित्रकाराला त्या व्यक्ती जशा जाणवल्या तसेच त्यांचे चित्रण येते. त्या व्यक्तीचे गुणदोष हे आत्मचरित्रकाराला जाणवलेले गुणदोष असतात. प्रत्यक्षात ते तसे असतीलच असे नाही. त्यामुळे आत्मचरित्रातील स्वभावचित्रणात अेकांगीपणाची शक्यता नाकारता येत नाही. परंतु ही अपरिहार्यपणे पडलेली मर्यादा असते. आणखी अेक मर्यादा म्हणजे आत्मचरित्राचा लेखक सोडून अितर पात्रांचे जे चित्रण आलेले असते ते ` संपूर्ण ` असत नाही. त्या पात्रांचे संपूर्ण व्यक्तिमत्व , त्यांची वातावरणाची पार्श्वभूमी , कारणमीमांसा यांना तिथे वाव नसतो. ज्या ज्या प्रसंगांच्या संदर्भात त्यांचा संबंध आलेला असतो, त्या त्या संदर्भातच त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये दिसून येतात. परंतु आत्मचरित्रात असे घडणे अटळ असते, म्हणून आत्मचरित्रलेखकाने त्या व्यक्तिमनाचा शोध कसा घेतला आहे , या दृष्टीनेच आत्मचरित्रातील व्यक्तिरेखेकडे पाहिले पाहिजे.

आत्मचरित्रातील स्वभावलेखनात सर्वात अधिक महत्व असते ते स्वत: आत्मचरित्रलेखकाला. कारण तोच या जीवनकथेचा नायक असतो. आत्मचरित्र हे लेखकाचेच चरित्र असल्याने त्यात त्याच्या व्यक्तिमत्वाचे अधिक चित्रण येणे स्वाभाविक असते. आत्मचरित्रात त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्व आपल्या नजरेसमोर अुभे राहते. परंतु याच्ही अेक धोका असतोच व त्यामुळे अेक दोष निर्माण होतो. स्वत:चे स्वभावचित्रण लेखकाने स्वत:च रेखाटलेले असल्याने येथेही अेकांगीपणाचा आरोप येण्याची शक्यता असते. याचे कारण स्वत:चे चित्र रेखाटणे ही अेक अत्यंत कठीण अशी कृती आहे. स्वत:ला स्वत:पासून दूर ठेवणे आणि ` स्व ` कडे दूरस्थाच्या

दृष्टिकोणातून पाहणे, हे तर योग्यांना सुध्दा साधू शक्त नाही. माणसे सर्व काही विसरून शकतात, पण आत्मप्रेमात ती इतकी गुंतलेली असतात की स्वत:चे निरीक्षण, समीक्षण आणि चित्रण करण्यासाठी आवश्यक असलेली अलिप्तता त्यांच्या वृत्तीत येऊ शक्त नाही. याचा अपरिहार्य परिणाम कित्येक आत्मचरित्रांवर झालेला दिसतो. ` चरित्रचंद्र ` मध्ये पांगारकर स्वत:च्या कर्तुत्वावर संतुष्ट आहेत, ना.सी. फडके आपले जीवन अेखाद्या कादंबरीसारखे रम्याद्भुत आहे, अशा कल्पनेत गुरफटले आहेत. ` क-हेचे पाणी ` मध्ये आचार्य अत्रे अहंपणाच्या कवुळातून बाहेर पडू शक्त नाहीत. त्यामुळे आपल्याच हाताने आपल्याच पाठीवर शाबासकीची थाप ते मारतात, असे वाटते. कित्येकजण आपल्या दु:खाचे व त्यागाचे आत्मचरित्रात मांडकल करतात, त्यामुळे आत्मचरित्र ही अेक स्वत:संबंधी आत्मसमाधानाने लिहिलेली जीवनकथा, अशी आत्मचरित्रांच्या बाबतीत अवस्था होऊन बसते. अुत्तम आत्मचरित्र हे बव्हधा दुर्मिळ असते याचे कारण आपल्या व्यक्तिगत रागव्देषातून व स्वत:संबंधीच्या आसक्तीतून बाहेर पडलेल्या जीवन-भक्तालाच स्वत:चे योग्य त्या संदर्भात चित्र रेखाटता येते. ` स्वान्तरासी नग्न पाहावे ` असे म्हटले जाते व ज्या लेखकांना हे साधते ते लेखक आपल्या जीवनाचे तटस्थपणाने अवलोकन करून आपले गुणदोष प्रकट करीत असतात. त्यामुळे त्यांचे चित्रण हे अेकांगी असले तरी अर्थपूर्ण असते. स्वभावलेखन ही अेक अत्यंत श्रेष्ठ व तितकीच दु:साध्य अशी कला मानण्यात येते. तथापि ही दु:साध्य कला लक्ष्मीबाई टिळकांना चांगलीच साध्य झाल्याचे दिसून येते. त्या आपले दोष पाहू शकतात, चुका कबूल करू शकतात, दुस-यांचे गुण ग्रहण करू शकतात. त्यामुळे ` स्मृतिचित्रा` सारखी आत्मचरित्रे आत्मसमर्थनाच्या दोषापासून अलिप्त राहू शकतात. अशा आत्मचरित्रातील स्वभावरेखेत वा.ल. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे ` स्वत:पासून स्वत:ला दूर सारून जर स्वत:कडेच परंतु त्रयस्थाच्या नजरेने बघता आले तरच त्याला

स्वत:चे यथार्थ दर्शन घडण्याचा संभव ` [११] याचा प्रत्यय येतो. हे यथार्थ दर्शन केवळ यथार्थ असून उपयोगाचे नाही तर ते कलात्मकही असावे लागते. ` आपणाला आत्मचरित्रात त्या व्यक्तीचे चित्र नको असते, चरित्र हवे असते. ... आत्मचरित्र हे आत्मचरित्र आहे, चित्र नव्हे.` [१२] हे वा.ल. कुलकर्णी यांचे मत या संदर्भात महत्वाचे वाटते.

आत्मचरित्रातील स्वभावरेखेतून मानवी प्रवृत्ती, ती तशी बनण्याची कारणे, परिस्थितीचा स्वभावावर व स्वभावाचा परिस्थितीवर होणारा परिणाम, स्वभाव वैशिष्ट्ये , स्वभावातील परिवर्तन, त्यांचा कृती- उक्तीवर होणारा परिणाम , आणि या सर्वातून एका व्यक्तीच्या जीवनाचा आखला जाणारा आलेख वाचकांच्या डोळ्यासमोर उभा केला जातो. अशा स्वभावचित्रणात मग आपोआपच मनोविश्लेषणाचे धागे गुंफलेले जातात. इतर कोणत्याही ललितकृतीपेक्षा आत्मचरित्रे मानसशास्त्रा- -ला अधिक खाद्य पुरवितात. आत्मचरित्राच्या स्वभावरेखनातून जिवंत व्यक्तिरेखा समोर उभ्या केलेल्या असतात. अशा व्यक्तिरेखा या विशिष्ट (Particular) असल्यातरी लेखकाने सूक्ष्म दृष्टीने शोध घेतला असेल तर त्या विश्वात्मकही ( Universal ) बनू शकतात. म्हणून आत्मचरित्रातील व्यक्तिरेखांचे महत्व सांगताना डॉ. नाईक यांनी मांडलेले विचार अर्थपूर्ण वाटतात. ते म्हणतात,

' The modern age is deeply interested in psychology - underst- -anding a right the highly complex composition of man's personality. Honest autobiographies are bound to be a great help in this direction - it is here we may be able to discover man in his nakedness.' १३

मानवी स्वभावाचे यथार्थ असे दर्शन आत्मचरित्रात घडत असल्याने आत्मचरित्राच्या अभ्यासामध्ये सर्वात अधिक महत्व स्वभावचित्रणास प्राप्त होते.

स्वभावचित्रणाच्या आधारेच त्या जीवनकथेची व वाङ्मयीन कृतीची वैशिष्ट्ये आपणास विशद करता येतात. लक्ष्मीबाअी टिळक यांच्या `स्मृतिचित्रे` या आत्मचरित्राचा अभ्यास करताना स्वभावचित्रणाच्या अनुषंगाने या वाङ्मयकृतीचा आधार असलेल्या लक्ष्मीबाअी टिळकांच्या आणि अितर व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाची मीमांसा येथे करावयाची आहे.

.....

3240
A

* * *



वरील चर्चेत आपणास व्यक्तिचित्रणाचा अेक कला म्हणून अभ्यास करताना आढळून येणाऱ्या गुणवैशिष्ट्यांचे विश्लेषण केलेले दिसून येते. त्याआधारे व्यक्तिचित्रणासंबंधी महत्वाच्या गोष्टी समजतात. त्या सारांशरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

व्यक्तिचित्रण हा बहुतेक वाङ्मयप्रकाराचा अेक महत्वाचा घटक आहे. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, खंडकाव्य या वाङ्मयप्रकाराप्रमाणे आत्मचरित्रात व्यक्तिचित्रणाला महत्व प्राप्त झालेले असते. व्यक्तीची विशिष्ट मनोरचना हेच व्यक्तिरेखा अमर करण्याचे खरे साधन आहे. व्यक्तिचित्रणासाठी निवडलेली व्यक्ती ' प्रतिमा ' म्हणजे मानवजातीची प्रतिनिधी असावे लागते. अशा व्यक्तीचे स्वभावलेखन करीत असताना त्यातील सुसंगतीचे भान ठेवणे आवश्यक असून त्यासाठी मनोविश्लेषणाचा अभ्यास अुपयुक्त ठरतो. कादंबरी, नाटक व लघुकथा हे वाङ्मयप्रकार रचनात्मक दृष्ट्या भिन्न असल्याने त्यातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूपही भिन्न असते. आत्मचरित्रातील व्यक्तिरेखा ही विशिष्ट (Particular) असली तरी तिच्या मनोधर्मामुळे ती सर्वसामान्य, प्रातिनिधिक ( Universal ) बनत असते. आत्मचरित्रात आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखकाच्याच व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब अुमटत असल्याने हे व्यक्तिदर्शन अेकांगी ठरण्याचा संभव असतो. तथापि लेखकाच्या तटस्थता, सत्यदर्शन, मनमोकळेपणा या गुणामुळे हे व्यक्तिचित्रण जिवंत, वास्तव व स्वाभाविक ठरत असते. आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणातून जे मानवी जीवनाचे व स्वभावाचे दर्शन घडते त्याची मानसशास्त्रीय मीमांसा करणे शक्य असल्याने अितर ललितकृतीपेक्षा आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार मानसशास्त्राचा अभ्यासविषय होअू शकतो.

.....

## संदर्भ - सूचि


१. सहस्त्रबुध्दे, पु.ग. - स्वभावलेखन
मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९३८, पृष्ठ ८.

२. फडके, ना.सी. - प्रतिमा-साधन,
देशमुख आणि कंपनी, पुणे-२.
सातवी आवृत्ती १९६०, पृष्ठ १०९.

३. सहस्त्रबुध्दे उनि, पृष्ठ ३२.

४. तत्रैव, पृष्ठ ५२.

५. तत्रैव, पृष्ठ १६२.

६. तत्रैव, पृष्ठ १७८.

७. तत्रैव, पृष्ठ १८४.

८. फडके उनि, पृष्ठ १०८.

९. सहस्त्रबुध्दे उनि, पृष्ठ ३३२.

१०. तत्रैव, पृष्ठ ३३०.

११. कुलकर्णी वा.ल. - वाङ्मयातील वादस्थळे
पॉप्युलर प्रकाशन - दुसरी आवृत्ती १९६२, पृष्ठ, १४८.

१२. तत्रैव, पृष्ठ १५०, १५७.

१३. Naik, Dr.D.G. - Art of Autobiography, Vidarbha - Marathwada Book Company, Poona, First published 1962, page, 217.


.....